जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०४/०७/२०२३
## दि.०३/०७/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ४४३/२०२३,भादविक ३९२,३४,भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५),महाराष्ट्र पोलीस अधि.कलम ३७(१)१३५ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय ५४ वर्षे,रा.कल्याणीनगर,पुणे |
| **आरोपीत** | मोटार सायकलवरील चार अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०१/०७/२०२३ रोजी रोजी पहाटे ०५/३० वा.पंचदिप सुपर स्टोअर समोरील रोडवर,शास्त्रीनगर चौका जवळ,येरवडा,पुणे या ठिकाणी |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे पायी जात असताना,नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांना पत्ता विचारण्याचा बहाणा करून,त्यांना त्यांचे जवळ येऊन,त्यापैकी एका इसमाने एक लोखंडा सारखे दिसणारें हत्यार बाहेर काढुन,फिर्यादीस हत्याराचा धाक दाखवुन,फिर्यादी यांचेकडील मोबाईल फोन व ७,०००/- रूपये रोख रक्कम असा एकुण २२,०००/- रू किचा ऐवज जबरी चोरी करून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. अंकुश डोंबाळे ९८२३५५६७१३ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रांतवाडी पो स्टे १६८/२०२३,भादविक ४५४,४५७,३८० |
| **फिर्यादी** | एक महिला,वय ५१ वर्षे,रा.खडकी,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२७/०६/२०२३ रोजी पहाटे ०३/१५ वा ते दि.०१/०७/२०२३ रोजी सकाळी ०७/३० वा.चे दरम्यान ए-१२, शुभम पार्क,को.ऑप.हौसींग सोसायटी,खडकी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहाय्याने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील कपाटातील लॉकर मधुन ३,७५,०००/- रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने घरफोडी चोरी करून नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. लहु सातपुते ८८३०९९५७७२ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणी काळभोर पो स्टे ४३१/२०२३,भादविक ३५३,४४७,४२७,५०४,५०६ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-४२, रा. मु. पो. नायगाव ता. हवेली जि. पुणे |
| **आरोपीत** | एक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०३/०७/२०२३ रोजी सकाळी १०/३० वा. त्यापुर्वी मागील ६ महिन्यांपासुन वेळोवेळी नायगाव ग्रामपंचायत हद्दीतील गट नं. ३५/१ मधील प्राथमिक आरोग्य केंद्र मालमत्ता क्र. ३३४ या सरकारी जागेवर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया ग्रामपंचायत,नायगाव येथे ग्रामसेवक असुन,यातील नमुद इसमाने गेले सहा महिन्यांपासुन नायगाव ग्रामपंचायत हद्दीतील गट नं.३५/१,मधील प्राथमिक आरोग्य केंद्र मालमत्ता क्र.३३४ या सरकारी जागेवर अनाधिकृतरित्या अतिक्रमण केलेले आहे. सदर जागेवर प्राथमिक आरोग्य उपकेंद्र संरक्षण भिंत बांधण्यासाठी बांधकाम विभाग जिल्हा परिषद,पुणे यांनी १० लाख रूपयेचा निधी मंजुर केलेला आहे. सदर बाबत शासन निर्णय क्र.झेडपीए-२०१५/प्रक्र.१०/वित्त-९/बांधकाम भवन,मुंबई,दि.२५/०३/२०१५ |

अन्वये महाराष्ट्र शासनाचे शासन आदेश पारित झालेले आहेत. त्याची त्यास कल्पना असतानादेखील त्याने जाणिवपुर्वक सदर सरकारी जागे मध्ये अतिक्रमण केलेले असल्याने,सदरचे अतिक्रमण काढण्यासाठी फिर्यादी हया स्वतः तसेच ग्रामपंचायत नायगावचा स्टाफ दि.२२/०६/२०२३ रोजी त्याठिकाणी गेले असता सदर इसमाने फिर्यादी व त्यांचे स्टाफ यांना अपशब्द वापरून व दमदाटी करुन,त्यांचेशी हुज्जत घालुन व जे.सी.बी.ची काच फोडुन त्याचे अंदाजे १५,०००/- रुपयांचे नुकसान करून,फिर्यादी हे करीत असलेल्या सरकारी कामात अडथळा निर्माण केला आहे. तसेच दि.०३/०७/२०२३ रोजी सरकारी संरक्षक भिंत बांधण्या साठी गेलेले ठेकेदार व गवंडी यांना शिवीगाळ करुन,तेथुन हाकलुन लावले आहे.

| | |
|---|---|
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. घोडके ८८८८८२४२०० |

**४**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडक पो स्टे २१२/२०२३,भादविक ३८४,३८५,५०४,महाराष्ट्र सावकारी अधिनियम कलम ४४,४५ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-४३ वर्ष,रा.गणेशनगर,धायरी,पुणे |
| **आरोपीत** | सचिन बापु इंदापुरकर,वय-४६ वर्ष,रा.५९४,शुक्रवार पेठ,शाहु चौक,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २५/०२/२०२० रोजीपासुन ते आजरोजी पर्यन्त श्री.ॲटो वर्क्स गॅरेज मध्ये ३१४,शुक्रवार पेठ,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी सन २०२० साली त्यांचे मित्र यांचे व्यवसायीक गरजेपोटी नमुद इसमाकडुन १० लाख रुपये दरमहा १० टक्के व्याज दराने घेवुन,फिर्यादी यांनी त्यांचा मित्र यांचेकडुन घेतलेले सोन्याचे दागिने तारण म्हणुन सदर इसमाकडे गहान ठेवले होते. त्यांनतर फिर्यादी यांनी त्यास रोख व ऑनलाईन स्वरूपात असे एकुण ४ लाख ७५ हजार रुपये दिले आहे. आ.क्र.१ याने त्याचेकडे तारण म्हणुन ठेवलेले सोन्याचे दागिने परस्पर मोडुन,त्यातुन ५ लाख ३९ हजार रुपये घेवुन असे एकुण १० लाख १४ हजार रुपये घेवुनही,त्याने अर्जदार यांची कार ही धमकावुन घेवुन जावुन,त्याचेसोबत आणलेल्या टी.टी. फॉर्मवर फिर्यादी यांच्या सहया घेवुन कार घेवुन गेला आहे. फिर्यादी यांनी त्यांची कार परत मागितली असता त्याने फिर्यादी यांना गाडी परत पाहिजे असेलतर मुददल व व्याज असे आणखीन १८ लाख रुपये दयावे लागतील नाहीतर गाडी परत मिळणार नाही असे म्हणुन फिर्यादीस शिवीगाळ करून,धमकी देवुन त्यांचेकडे खंडणीस्वरूपात आणखीन १८ लाख रुपयेची मागणी केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, सोनवणे ९९२३६४०३०३ |

## <u>दि.०४/०७/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>

**५**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बिबवेवाडी पो स्टे १२०/२०२३,भादविक ५०६(२),४२७,३४,आर्म ॲक्ट कलम ४,(२५),महाराष्ट्र पोलीस अधि. कलम ३७(१)(३)१३५,क्रिमिनल लॉ अमेंडमेंट कलम ३ व ७ |
| **फिर्यादी** | अमोल चव्हाण,वय-२९ वर्षे,रा.गणपतनगर,बिबवेवाडी,पुणे |
| **आरोपीत** | १.सनी संतोष भरगुडे,वय-२३ वर्षे रा.गणपतनगर,पापळ वस्ती,बिबवेवाडी,पुणे २.संदिप संपत चव्हाण,वय-२५ वर्षे,रा.कात्रज,पुणे ३.निलेश राजु कुडले,वय २३ वर्षे,रा.निसर्ग हॉटेलचे मागे,कात्रज पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०३/०७/२०२३ रोजी रात्रौ ००/३० वा.सर्वे नंबर ६३४/७/ए,चाळ क्र.०३,गणपतनगर,पापळ वसाहत, बिबवेवाडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे राहते घरी असताना,फिर्यादी यांचे घराजवळ पुर्वी राहत असलेले यातील नमुद इसमांनी फिर्यादी यांना शिवीगाळ करून,त्यांचे घरावर लाथा मारुन,फिर्यादी यांचे घराचे दारावर व खिडकीवर त्यांचेकडील लोखंडी हत्याराने मारुन नुकसान केले. तसेच फिर्यादी व त्यांचे भावाला जीवे मारण्याची धमकी दिली. त्यावेळी आजुबाजुचे नागरीक जमले असता,सदर इसमांनी त्यांचे हातातील लोखंडी हत्यार लोकांवर उगारुन हवेत फिरवुन दहशत निर्माण केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. नरेंद्र शिंदे ८८८८३५०४०४ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**